दिव्य मराठी जळगाव सिटी 22-10-2023

# विद्यापीठात दिले सायबर सुरक्षेचे धडे

## सतर्कता : नाटिका, पोस्टर प्रदर्शनातून विद्यापीठात विद्यार्थ्यांना दिल्या टिप्स



विद्यापीठात राष्ट्रीय सायबर सुरक्षा विषयाबाबत जनजागृती करताना विद्यार्थी.

जळगाव | कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणक शास्त्र प्रशाळा व क्विक हिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठात 'राष्ट्रीय सायबर सुरक्षा माह' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यात नाटिका, पोस्टरातून जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमात जळगाव सायबर पोलिस स्टेशनचे पोलिस उपनिरीक्षक डिगंबर थोरात यांनी विविध प्रकारच्या ऑनलाइन सायबर धोके तसेच ते कशा पद्धतीने रोखता येतील याबाबत माहिती दिली. पोलिस नाईक सचिन सोनवणे यांनी फोटो मॉर्फिन, सायबर अशा विविध प्रकारच्या गुन्ह्यांबद्दल माहिती देऊन मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी दोन नाटिका सादर केल्या. या कार्यक्रमात 'सायबर फ्रॉड पासून सावध व्हा, सांगतोय आपला पोलिस बाप्पा' या गाण्यावर पोस्टर्स प्रेझेंटेशन झाले व सायबर सुरक्षेची शपथ विद्यार्थ्यांना देण्यात आली. संगणकशास्त्र प्रशाळेचे संचालक व व्य. प. सदस्य प्रा. एस. आर. कोल्हे, प्रा. राजीव आमले, प्रा. एस.व्ही. कापसे, मनोज पाटील उपस्थित होते.